# महाराष्ट्र शासन

## आरोग्य सेवा, आयुक्तालय, पुणे कार्यालय


| | | |
|---|---|---|
| संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु , नोंदणी, महाराष्ट्र राज्य, पुणे | २६१२२२५६ (वै)<br>२६१२२५०८ (का) | संचालक, आरोग्य सेवा , आयुक्तालय,<br>मध्यवर्ती इमारत पुणे ४११००१<br>**ईमेल** - : dhspune१@gmail.com,<br>Crs_d८१@yahoo.com |
| आरोग्य सेवा<br>**परिपत्रक** | जा.क्र.आमाजीआ/ कक्ष ८१/ ना.नो.प/ज-मृ. नोंदणी /सीआरएस पोर्टल वापर/ 8314-90/२६<br>दिनांक २७/०७/२०२६ | |


प्रती,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू,
जिल्हा परिषद .............. सर्व

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी,
तथा निबंधक जन्म मृत्यू,
महानगरपालिका, मुंबई

3) वैद्यकीय अधिकारी आरोग्य तथा
निबंधक जन्म मृत्यू महानगरपालिका (सर्व)

**विषय :** राज्यात जन्म व मृत्यू नोंदणी करण्यासाठी फक्त मा. महानिबंधक भारत सरकार यांनी विकसित केलेल्या CRS Portal याच संगणक प्रणालीचा वापर करणेबाबत.

**संदर्भ :**

१) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१४ § VS (CRS) दि. २९/१२/२०१४

२) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१४ § VS (CRS) दि. २७/०७/२०१५

३) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र. ४३७/२०१६ दि.१२/०१/२०१६

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग या कार्यालयाचे पत्र क्र. संग्राम २०१५ / प्र. क्र. ९०/ संग्राम कक्ष दि. ११/०२/२०१६

५) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, परिपत्रक संकीर्ण -२०१६ / प्र. क्र. ४६ / नवि २० दि. १२/०२/२०१६

६) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१८ § VS (CRS) दि. १२/०६/२०२५

Scanned with OKEN Scanner

७) या कार्यालयाचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी /Advisory/१३९१९ -५८ /२०२५ दिनांक.४/११/२०२५

८) मा. मुख्य निबंधक, जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य या कार्यालयाचे पत्र क्र. संआसे/ कक्ष ८१ /ना.नों.प./ ज.मृ.नोंदणी Advisory/ १५४६३-५०३ /२०२५ दिनांक ३०.१२.२०२५

९) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी/ CRS Advisory / ४५३०-४६०७ /२०२६ दिनांक.२०/०४/२०२६

१०) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /CRS Portal/Multiple Login / ७३४९-९६ /२६ दिनांक.०३/०७/२०२६

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, 1969, त्याअंतर्गत महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, 2000 तसेच जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम, **2023** अन्वये जन्म व मृत्यू घटनांची नोंदणी ही कायद्यातील तरतुदी नुसार करण्यात येते. मा. महानिबंधक भारत सरकार यांनी (Registrar General of India - RGI) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व परिपत्रकांनुसार जन्म मृत्यू नोंदणी करण्यात येते. या संदर्भातील उपरोक्त संदर्भिय विविध पत्रांद्वारे राज्यातील सर्व जिल्हा निबंधक आणि निबंधकांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मा. प्रधान सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक **२४/०७/२०२६** रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील जन्म व मृत्यू नोंदणीची सर्व प्रक्रिया भारत सरकारच्या Civil Registration System (CRS) Portal द्वारेच करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम, २०२३ मधील कलम ४ (५) अंतर्गत राज्यस्तरावर Civil Registration System कार्यान्वित करण्यात आले असून, कलम ८ नुसार जन्म व मृत्यू घटनांची नोंद विहित पद्धतीने करणे बंधनकारक आहे. तसेच कलम १७ नुसार नोंदणी अभिलेख व त्यावर आधारित प्रमाणपत्रे ही अधिकृत अभिलेख मानली जातात. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील जन्म व मृत्यू नोंदणी, प्रमाणपत्र निर्गमन, दुरुस्ती, अद्ययावत नोंदी व इतर सर्व सेवा भारताचे मा. महानिबंधक (RGI) यांनी विकसित केलेल्या CRS Portal वरूनच करण्यात याव्यात.

यापुढे कोणत्याही निबंधक कार्यालयामार्फत, CRS Portal व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वतंत्र किंवा स्थानिक संगणक प्रणाली किंवा सॉफ्टवेअर अथवा पोर्टलवर जन्म व मृत्यू नोंदणीची समांतर प्रक्रिया राबवू नये. अशा प्रकारे स्वतंत्र प्रणालीचा वापर आढळून आल्यास संबंधित निबंधक यांच्याविरुद्ध प्रचलित नियमांनुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

याशिवाय, ज्या जन्म व मृत्यू घटनांची नोंद पूर्वी करण्यात आली असून त्याबाबत प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत परंतु त्या घटनांची माहिती अद्याप CRS Portal वर उपलब्ध नाही, अशा सर्व घटनांची नोंद **CRS Portal मधील "Add Old Event"** या सुविधेचा

Scanned with OKEN Scanner

वापर करून वर्ष निहाय नोंदविण्यात यावी. जेणेकरुन राज्यातील सर्व जन्म व मृत्यू नोंदी राज्य स्तरावरील एकत्रित डेटाबेसमध्ये उपलब्ध होतील तसेच नागरिकांना भविष्यात कोणत्याही ठिकाणाहून सुलभ, पारदर्शक व अखंडित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल.

त्याअनुषंगाने सर्व जिल्हा निबंधक, निबंधक व उपनिबंधक यांना पुढील बाबींचे काटेकोर पालन करावे.

1. जन्म व मृत्यू नोंदणीची संपूर्ण कार्यवाही केवळ **RGI CRS Portal** वरूनच करण्यात यावी.
2. कोणत्याही स्थानिक अथवा स्वतंत्र सॉफ्टवेअर, पोर्टल किंवा संगणक प्रणालीमध्ये समांतर नोंदणी करू नये.
3. **"Add Old Event"** द्वारे नोंद करताना मूळ जन्म अथवा मृत्यू नोंदवही, उपलब्ध कार्यालयीन अभिलेख व पूर्वी निर्गमित जुन्या प्रमाणपत्राची प्रत अपलोड करून त्यानुसार सर्व माहिती अचूकपणे भरावी तसेच मूळ प्रमाणपत्र जसेच्या तसे अपलोड करावे.
4. जन्म व मृत्यू नोंदणीतील दुरुस्तीची कार्यवाही जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १५ तसेच महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम ११ नुसारच करण्यात यावी. तसेच दुरूस्ती करायची असल्यास मूळ प्रमाणपत्रामध्ये, रकाण्यात दुरूस्ती करून सही, दुरूस्तीचा दिनांक व नाव लिहावे.
5. यापुढील सर्व नोंदणी, प्रमाणपत्र निर्गमन, दुरुस्ती, अद्ययावत माहिती व इतर सर्व सेवा केवळ **CRS Portal** द्वारेच देण्यात याव्यात.
6. वरील सूचनांची आपल्या स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करून अधिनस्त सर्व निबंधक आणि उपनिबंधक कार्यालयांना आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात तसेच त्याबाबत नियमित आढावा घ्यावा.

करिता, जिल्हा निबंधक यांनी वरीलप्रमाणे सूचनांचे पत्र आपल्या अधिनस्त सर्व ग्रामीण व शहरी भागातील निबंधक (जन्म व मृत्यू) यांना त्वरित माहिती देण्यात यावी.

डॉ. विजय कंदेवाड
संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) तथा
मुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव:- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२/ वरीलप्रमाणे सूचना परिमंडळातील सर्व जिल्हयांना निर्गमित करण्यात याव्यात.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

१. मा. उप महानिबंधक, भारत सरकार, 2A मान सिंग रोड, नवी दिल्ली.
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई.
३. मा. सहसचिव, भारत सरकार तथा संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा . आ.अ, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

५. संचालक (रुग्णालये) आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.

६. उपसंचालक आरोग्य सेवा (आ.मा.जि.आ) तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.

Scanned with OKEN Scanner